**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक १२ मे २०२६**

**ठळक बातम्या**

1. **वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची नीट परीक्षा रद्द, पेपरफुटीचा तपास सीबीआय करणार.**
2. **चंद्रपूरच्या उज्ज्वला सोयम यांचा राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्काराने सन्मान; राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते गौरव.**
3. **नागपूर जिल्हयातील कोराडी इथल्या श्री महालक्ष्मी मंदिर परिसरात उभारण्यात आलेली २०६ फूट उंच भव्य हनुमान मूर्ती उद्घाटनासाठी सज्ज.**
4. **विदर्भात उन्हाचा तडाखा; उद्या आणि परवा अकोला, अमरावती मध्ये उष्णतेची लाट.**

**आता सविस्तर बातम्या** .......

नीट परिक्षा

देशभरात विविध केंद्रांवर ३ मे रोजी घेतलेली वैद्यकीय प्रवेशासाठीची NEET-UG २०२६ परीक्षा रद्द केल्याचं एनटीए अर्थात राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं आज जाहीर केलं. परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिका फुटल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतला असून या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवला आहे. ही परीक्षा पुन्हा होणार असून मात्र त्या तारखा जाहीर झालेल्या नाहीत. फेरपरीक्षेच्या तारखा तसंच नव्यानं प्रवेशपत्र जारी करण्याचे वेळापत्रक लवकरच अधिकृत माध्यमांतून जाहीर केले जाईल. या प्रकरणाच्या चौकशीसाठी सीबीआयला सर्व आवश्यक कागदपत्रे, नोंदी दिल्या जातील तसंच तपासात पूर्ण सहकार्य केलं जाईल, असं एनटीए नं म्हटलं आहे. नीट ही परीक्षा एमबीबीएससह वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशासाठी घेतली होती. सुमारे २३ लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती.

पंतप्रधान दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या शुक्रवारपासून संयुक्त अरब अमिरात, नेदरलँडस, स्वीडन, नॉर्वे आणि इटली या पांच देशांच्या सहा दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात मोदी शुक्रवारी यूएईमध्ये पोहोचतील. तिथे त्यांची अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायद अल नाह्यान यांची भेट नियोजित आहे. दोन्ही नेते द्विपक्षीय मुद्द्यांवर, विशेषत: ऊर्जा सहयोग तसंच परस्पर स्वारस्य असलेल्या, प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्यांवर आपले विचार मांडतील. या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात पंतप्रधान नेदरलँडसमध्ये राजे विल्यम अलेक्झांडर आणि राणी

मॅक्सिमा यांची भेट घेणार असून ,त्यानंतर ते रॉब जेटन यांच्याबरोबर चर्चा करणार आहेत. आपल्या स्वीडन दौऱ्यात स्वीडिश समकक्ष क्रिस्टर्सन यांच्यासह  पंतप्रधान द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.  चौथ्या टप्प्यात पंतप्रधान सोमवारी नॉर्वेमध्ये तिसऱ्या भारत नॉर्डिक शिखर बैठकीमध्ये सहभागी होणार आहेत. भारताच्या  पंतप्रधानांची नॉर्वेला ही 43 वर्षातील पहिली भेट असेल. आपल्या दौऱ्याच्या अंतिम टप्प्यात, पंतप्रधान, इटलीचे राष्ट्रपती सर्जियो मॅटारेला यांची भेट घेतील आणि प्रधानमंत्री जॉर्जियामेलोनी यांच्याशी चर्चा करतील. अलीकडेच झालेल्या भारत-युरोपियन संघ मुक्त व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर, भारताची युरोपसोबतची भागीदारी अधिक दृढ होण्यास या दौऱ्यामुळे मदत होईल असं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

इंधन पुरवठा

देशात इंधन पुरवठ्याची कोणतीही समस्या नसल्याचं पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी आज स्पष्ट केलं. पश्चिम आशियातली  परिस्थिती  लक्षात घेऊन केंद्र सरकारनं एल पी जी उत्पादन दररोजच्या ३५-३६ हजार टनांवरून ५४ हजार टन इतकं वाढवलं आहे, असं ते म्हणाले. नवी दिल्लीतल्या सी आय आय वार्षिक व्यापारी शिखर परिषदेत ते बोलत होते. देशात कच्च्या तेलाचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.  पंतप्रधान मोदी यांच्या काटकसरीच्या आवाहनाकडे सावधगिरीचा इशारा म्हणून पाहिलं पाहिजे आणि पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे देशावर परकीय चलनाचा ताण येऊ नये यादृष्टीनं उपाययोजनांचा विचार केला पाहिजे, असं पुरी म्हणाले.

चंद्रशेखर बावनकुळे

महात्मा गांधी यांच्या स्वदेशीच्या विचारालाच पंतप्रधान नरेंद्र मोदी  पुढे नेत असून देशाची संपत्ती देशातच राहणे आवश्यक असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे  यांनी म्हटले आहे. स्वदेशीच्या मुद्द्यावर टीका करणाऱ्यांना प्रत्युत्तर देताना त्यांनी पेट्रोल-डिझेलला इथेनॉल आणि विजेला सोलर हा प्रभावी पर्याय असल्याचे सांगितले. चार्टर्ड विमानाचा वापर केवळ तातडीच्या कामांसाठी वर्षातून चार-पाच वेळाच केला जातो आणि त्यासाठी मुख्यमंत्र्यांची मंजुरी आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रशासकीय बैठका प्रामुख्याने ऑनलाईन घेतल्या जात असून विरोधक सततच्या पराभवामुळे अस्वस्थ झाल्याची टीकाही बावनकुळे यांनी केली.

आंतरराष्ट्रीय परिचारिका दिवस

महाराष्ट्राच्या दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागात आरोग्यसेवेची मशाल तेवत ठेवणाऱ्या, उज्ज्वला महादेव सोयम  यांचा आज नवी दिल्ली येथे गौरव करण्यात आला. आंतरराष्ट्रीय परिचारिका दिवस 2026 निमित्त राष्ट्रपती भवनात आयोजित सोहळ्यात, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते उज्ज्वला  सोयम यांना त्यांच्या अतुलनीय कार्याबद्दल प्रतिष्ठित राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल

पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या विशेष सोहळ्यात देशभरातून निवडक एकूण 15 नर्सिंग अधिकारी कर्मचारी यांचा त्यांच्या उत्कृष्ट सेवेसाठी सन्मान करण्यात आला.या सोहळ्यात केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा, आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि आरोग्य सचिव पुण्य सलीला श्रीवास्तव उपस्थित होत्या.  चंद्रपूर जिल्ह्यात आदिवासी भागांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती करणं, स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंध तसंच नक्षलग्रस्त भागात आणि आपत्तीकाळात गर्भवती स्त्रियांसाठी केलेल्या आरोग्य सेवेसाठी सोयम यांना हा पुरस्कार देण्यात आला.

अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप

ओला, उबर आणि रॅपिडोसारख्या अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप सेवा तात्काळ बंद करून संबंधित कंपनी मालकांवर FIR दाखल करण्याची मागणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. तशा आशयाचे पत्र महाराष्ट्र सायबर विभागाच्या अतिरिक्त पोलीस महासंचालकांना सरनाईक यांनी पाठवले आहे. राज्यात गेल्या काही महिन्यांपासून विविध ॲप्सच्या माध्यमातून कोणतीही वैध परवानगी, शासन मान्यता किंवा परिवहन विभागाच्या नियमांचे पालन न करता प्रवासी वाहतूक सुरू आहे. विशेषतः रॅपिडोसारख्या संस्थांच्या अनधिकृत बाईक टॅक्सींचे प्रमाण वाढत असून, ही बाब सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस

राष्ट्रवादी काँग्रेसनं केंद्रीय निवडणूक आयोगाला पाठविलेल्या कार्यकारिणीच्या यादीत प्रफुल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ यांची नावे नसल्याचे उघड झाल्याने गदारोळ निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे २९ एप्रिलला पाठविलेल्या या यादीत सरचिटणीस म्हणून पार्थ पवार आणि चिटणीस म्हणून जय पवार यांच्या नावांचा समावेश आहे. मात्र कारकुनी चुकीमुळे हे पत्र पाठवले असून लवकरच त्यात दुरुस्ती केली जाईल, असं पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी समाज माध्यमांद्वारे कळवलं आहे.

हनुमान मूर्ती

नागपूर जिल्ह्यातील कोराडी येथील श्री महालक्ष्मी मंदिर परिसरात उभारण्यात आलेली २०६ फूट उंच भव्य हनुमान मूर्ती उद्घाटनासाठी सज्ज झाली आहे. या मूर्तीचे उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह  यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

तब्बल २०६ फूट उंच आणि सुमारे १६२ फूट विस्तार असलेली ही प्रतिमा दूरवरूनही भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे. या मूर्तीचे विशेष आकर्षण म्हणजे अत्याधुनिक प्रोजेक्टरच्या माध्यमातून सादर

करण्यात येणारी 'हनुमान चालीसा'.यामुळे भाविकांना भक्तीचा एक वेगळाच आध्यात्मिक अनुभव घेता येणार आहे.

हवामान

विदर्भात पुन्हा एकदा उन्हाचा तडाखा जाणवू लागला असून आज दुपारी अडीच वाजता नोंदवलेल्या तापमानानुसार, अकोला जिल्ह्यात सर्वाधिक 44. 9 दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. अमरावती इथं 44. 6 तर वर्गात 43. 2 आणि नागपूरसह बुलढाणा, ब्रह्मपुरी, चंद्रपूर या सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान 42 अंश सेल्सिअसच्या पुढे आहे. अकोला जिल्ह्यामध्ये उष्णतेच्या लाटेचा येलो अलर्ट जारी करण्यात आला असून उद्या आणि परवा अकोला आणि अमरावती जिल्ह्यात येलो अलर्ट कायम राहणार आहे.

आयपीएल क्रिकेट

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत, आजचा सामना गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात होणार आहे. अहमदाबादमध्ये नरेंद्र मोदी मैदानावर संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. काल धर्मशाला इथे झालेल्या सामन्यात, दिल्ली कॅपिटल्सने पंजाब किंग्जचा ३ गडी राखून पराभव केला.

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर मंडळात गोंदिया आणि राजनांदगाव रेल्वे स्थानकांवर स्वयंचलित विक्री मशीन (ऑटोमॅटिक व्हेंडिंग मशीन) सेवा सुरू करण्यात आली आहे. या सुविधेमुळे प्रवाशांना खाद्यपदार्थ आणि पेय सहज, जलद व स्वच्छ पद्धतीने उपलब्ध होणार आहेत. मंडल रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वरिष्ठ मंडल वाणिज्य व्यवस्थापक दिलीप सिंह यांच्या नेतृत्वात ही सेवा सुरू करण्यात आली.

पोलिसांना घरं

जनतेच्या सुरक्षेसाठी सातत्यानं कार्यरत असलेल्या पोलिसांना घरं मिळावीत, यादृष्टीनं राज्य सरकारनं घरबांधणी अग्रिम म्हणून १ हजार ७६८ कोटी रुपये मंजूर केले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. राज्य पोलिस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडे आलेल्या प्रस्तावांसाठी ५ हजार ४५९ पोलिसांच्या घरांसाठी ही रक्कम देण्यात येणार आहे.

******